RNI-NO : 37218-2010 ISSN - 2229 - 4929
Post Registration No : Akshar-vangmay-L-2/67/RNP/OSD-266/2011-2013


नॅक 'ए' ग्रेड

एकी हेच बळ

Estd. 1919

शताब्दी १००

सन १९१९ - २०१९




Book-Post

प्रति, __________

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

प्रेषक,

डॉ. नानासाहेब सूर्यवंशी, 'प्रणव' रुक्मेनगर, थोडगा रोड, अहमदपूर, जि. लातूर-४१३५१५

अक्षर वाङ्मय हे मासिक कल्पना मल्टीटेक, ४६१/४, सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे-४११०३० येथे मुद्रित करुन प्रकाशक

P.R.T.-F-23015
Regd.No. :M.H.705/15



ISSN-2455-9970
RNI-MAHMAR/2016/66483

# मासिक जीवन गौरव

www.jeevangauravmagazine.com

सामाजिक, साहित्यिक, क्रीडा, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्राला वाहिलेले मासिक



## दिवाळी विशेषांक

## "ईडा पिडा टळू दे बळीचे राज्य येऊ दे"

अंक-अकरावा / वर्ष-सहावे / नोव्हेंबर -२०२१ / स्वागत मूल्य २०/-

www.jeevangauravmagazine.com

Principal,
Jawahar Arts, Science & Commerce College,
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad

Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad

मासिक जीवन गौरव महाराष्ट्र राज्य

## अंतरंग


| | |
|---|---|
| * ईडा पिडा टळू दे, बळीचे राज्य येऊ दे (संपादकीय) | ३ |
| १. व्यथा बळीराजाची (संदीप नथुराम भायदे) | ४ |
| २. पाऊस (कविता) दादासाहेब शेलार | ७ |
| ३. जगाच्या पोशिंद्याच्या अडचणी कधी संपणार... (श्याम रावले) | ८ |
| ४. गारपीट (कविता) खुशाल गुल्हाने | १० |
| ५.आवणीची सुगी (प्रा. धनाजी जनार्दन बुटेरे) | ११ |
| ६. येवो बळीचे राज्य (कविता) मधुकर गराटे | १३ |
| ७. व्यथा बळीराजाची (दिलीप नारायण पाटील) | १४ |
| ८. संत तुकाराम अभंग (कविता) अनिता कांबळे | १६ |
| ९. व्यथा बळीराजाची (विनोद बब्रुवान जाधव) | १७ |
| १०. आजच्र्या शेतकऱ्यांची – व्यथा व दशा (महादेव आनंदा हवालदार) | २० |
| ११. नाते : एक सुंदर अनुभूती ! (अर्जुन सदाशिव वेलजाळी) | २३ |
| १२. जीवन गौरव ने आम्हाला काय दिले (कविता) छाया सोमनाथ देसले | २६ |
| १३. होय! मी बळीराजा बोलतोय (नागनाथ गुंडप्पा लक्षेटे) | २७ |
| १४. माझा बाप शेतकरी (कविता) सुचेता विजयकुमार भिसे | २९ |
| १५. शेतकऱ्यांच्या व्यथा (कु. हर्षदा बी. चोपने) | ३० |
| १६. तिफन (कविता) आराधना गुरव | ३२ |
| १७. शेतकरी अन् मजुरांचा वाली कोण.. (विकास सुखधाने) | ३३ |
| १८. वृद्धाश्रम शाप की वरदान (वनिता महादेव लिचडे) | ३५ |
| १९. अहिंसा परमो धर्मः (डॉ. सत्येंद्र राऊत ) | ३७ |
| २०. शेतकऱ्याची व्यथा आणि दशा.... (कविता) आकांक्षा काळे | ३९ |
| २१. कचरा येचनारी बाई (सु. पुं. अढाऊकर.) | ४० |
| २२. व्यथा पिकलेल्या पानांची... ( स्विकृती अशोक खरतडे) | ४२ |
| २३. वाचकांच्या प्रतिक्रिया | ४४ |
| २४. बुद्धसार (कविता) संजय सांगोलकर | ४५ |
| २५. शेतकरी (कविता) रेखा बाजीराव काळे | ४६ |
| २६. व्यथा... (कविता) संदिप पाटोळे | ४६ |
| २७. व्यथा बळीराजाची (कविता) प्रमिलाताई सेनकुडे | ४६ |
| २८. पोशिंदा (कविता) किशोर गोवर्धन बुरघाटे | ४७ |
| २९. राज्य बळीचं (कविता) तांबोळी शबाना उस्मान | ४७ |
| ३०. पोशिंदा (कविता) प्रदीप बडदे | ४७ |
| ३१. दिस जातील निघून (कविता) | ४७ |
| ३२. पावसा तु ...! (कविता) आश्विनी पांडुरंग धाट (कुलकर्णी) | ४८ |
| ३३. माह्य वावर वावर (कविता) वासुदेव महादेवराव खोपडे | ४८ |
| ३४. नशीबाच्या रेघा ! (कविता) विद्या प्रशांत जाधव | ४८ |
| ३५. शेतकरी (कविता) कल्याणी मादेशवार | ४८ |
| ३६. बा राष्ट्रसंत तुकडोजी (कविता) जितेंद्र भोयर | ४९ |
| ३७. संदेशदूत (कविता) सुनिल माथने | ४९ |
| ३८. अवकाळी (कविता) धनाजी जनार्दन बुटेरे | ४९ |
| ३९. शेतकऱ्यांच जिनं आमचं (कविता) प्रकाश शेंडगे पाटील | ५० |
| ४०. वृद्धाश्रम शाप की वरदान (कविता) विना विटकर | ५१ |
| ४१. नाती-गोती (कविता) बालाजी शंकरराव सोनाळे | ५१ |
| ४२. व्यथा शेतकऱ्यांची (कविता) राजेश लक्ष्मण वऱ्हाडे | ५१ |
| ४३. शेत रडले... (कविता) युवराज नळे 'रौशन' | ५२ |
| ४४. माझा बळीराजा (कविता) मनिषा विनायक साळवे | ५२ |


*****


**जीवन गौरव मासिक ॲप प्ले स्टोअरवरुन डाऊनलोड करा तेही मोफत व वाचा जीवन गौरव अंक**

**www.jeevangauravmagazine.com या वेबसाईटला आवश्य भेट द्या.**

अत्यंत महत्वाचे
मासिक जीवन गौरव साठी वार्षिक वर्गणी / जाहिरात शुल्क किंवा देणगी पाठविण्यासाठी देशभरातील कुठल्याही बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखेत पुढील खाते क्रमांकावर जमा करता येते.

महाराष्ट्र बँक खाते क्रमांक : 60238696645 शाखा गारखेडा औरंगाबाद (1770), IFSC Code : MAHB 0001770, MICR Code: 431014019 (टिप पैसे भरल्यानंतर व्हॉटस् ॲप क्रमांक 8888125610 किंवा 8421141104 या क्रमांकावर एसएमएस करावा)



**कार्यालयीन पत्ता**

संपादक, जीवन गौरव मासिक,
प्लॉट नं. २७, आनंद नगर
गल्ली नं. ६, गारखेडा परिसर,
औरंगाबाद - ४३१००९
मो.नं. ८८८८१२५६१०, ८४२११४११०४
email : jeevangaurav76@gmail.com
Blog : http://jeevangaurav.blogspot.in
www.jeevangauravmagazine.com



या अंकातील व्यक्त झालेली मते संबंधीत लेखकांची असून त्यास संपादक, संचालक मंडळ सहमत असेलच असे नाही.
कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयाअंतर्गत १५ दिवसांच्या आत




चारा पाण्याची सोय नाही यंदा, भाकर शोधतो जगाचा पोशिंदा...


Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad



# अहिंसा परमो धर्मः

– डॉ. सत्येंद्र राऊत
अणदूर, जि. उस्मानाबाद
मो.८२०८७४०८८०

भारतामध्ये ऋषि-मुनींपासून महात्मा गांधींपर्यंत संतांनी जीवनात अहिंसेला मुख्य स्थान दिले आहे. हिंसा मग ती कोणत्याही कारणासाठी घडणारी असो अधर्मच होय.' *अहिंसा परमो धर्मः :' म्हणजे अहिंसा हा श्रेष्ठ धर्म होय, असे महाभारतात व अन्यत्र हिंदु धर्मग्रंथांत वारंवार सांगितले आहे. राज्यव्यवस्था समाजधारणेकरिता करावी लागते, समाजधारणा म्हणजेच अहिंसा असा अर्थ महाभारतात केला आहे. सार्वत्रिक अहिंसा अशक्य आहे कारण 'जीवो जीवस्य जीवनम्य' असा जीवसृष्टीचा नियम दिसतो प्रत्येक माणसाकडून सूक्ष्मजंतूंचा नाश नकळत होतच असतो म्हणून शक्यतो जाणूनबुजून हिंसा होणार नाही, इतकाच प्रयत्न माणसाला शक्य आहे. बलदंड व आततायी अशा मनुष्याचा प्रतिकार करताना त्याची हिंसा करणे कित्येकदा अपरिहार्य ठरते. परंतु प्राणिमात्रावर दया करणे हा विधायक दृष्टिकोन व परोपकार हे अहिंसा धर्माचे विधायक स्वरूप आहे. हिंसा त्याज्य आहे आणि हिंसेमध्ये इतर अनेक पापे उद्भवतात म्हणून धर्माचरण करणाऱ्या माणसाने कोणत्याही स्वरूपातील स्थूल अगर सूक्ष्म हिंसा करण्याचा प्रयत्न टाळला पाहिजे.

अहिंसेला जगातील सर्व धर्मामध्ये महत्त्वाचे स्थान मिळालेले आहे. येशू ख्रिस्तानेही आपल्या अनुयायांना 'तू प्राणिहत्या करू नकोस ' अशी एक आज्ञा दिलेली आहे. 'दया धर्म का मूल हे असे तुलसीदासांनी या वाक्यांतून अहिंसेचे असे अर्थ प्रकट केले आहे.

जैन आचारशास्त्रात साधूसाठी अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह ही पाच महाव्रते सर्वसंग्राहक म्हणून सांगितलेली आहेत. बाकीची इतर व्रते गौण आहेत. या पाच महाव्रतांमध्येसुद्धा अहिंसाच प्रमुख आहे. अहिंसाव्रताचे अधिक चांगल्या रीतीने पालन इतर महाव्रतांमुळे होते. अहिंसातत्त्वाची मीमांसा जैन धर्मामध्ये अतिशय बारकाईने केलेली आहे. एखाद्या जीवाचा वध करणे किंवा त्याला दुःख देणे म्हणजे हिंसा. राग-द्वेषाच्या अधीन होऊन अगर निष्काळजीपणामुळे मनुष्य जेव्हा दुसर्या जीवाला दुःख देतो, तेव्हा ते कृत्यही 'हिंसाच ठरते. अशुभ भावनेने केलेले कोणतेही कृत्य हिंसा या दोषास पात्र होते. परंतु मुलास चांगले वळण लागावे या हेतूने त्याला शिक्षा करणारा बाप हिंसक ठरत नाही. ज्यावेळी आपल्या मनामध्ये अशुभ भाव उत्पन्न होतात, त्या वेळी आपल्याच आत्म्याची हिंसा होत असते. याउलट, एखादा मनुष्य चांगल्या हेतूने प्रेरित होऊन संयमाने वागत असला आणि त्याच्या हातून जीववध घडला किंवा दुःख उत्पन्न झाले तरी ती हिंसा दोषास्पद होत नाही. साधू आपल्या हातून हिंसा घडू नये यासाठी संयम पाळतो.

अहिंसेचा पाया मानवी मनातील करुणा, दया हा आहे. त्यापेक्षाही हिंसेला हिंसेने उत्तर देण्यापेक्षा अहिंसेच्या सामर्थ्यावर ती रोखता येते हा विश्वास त्यामध्ये आहे. शारीरिक सामर्थ्यापेक्षा माणसाजवळ असलेल्या बुद्धीच्या व मनाच्या शक्तीला आवाहन करून अहिंसा हिंसेचा प्रतिकार करू शकते, अहिंसेचे उगमस्थान मानवजातीबद्दलची अपार करुणा हे होय. धर्म-संस्थापकांच्या व प्रेषितांच्या मनात मानवी मनाच्या उन्नयनाची अवस्था म्हणून अहिंसेला किंमत होती. ' अहिंसा परमो धर्मः' ही एक जीवनप्रणाली म्हणून काहींनी स्वीकारलेली आहे. केवळ मानवजातीपुरतीच त्यांची अहिंसावृत्ती मर्यादित ठेवणे त्यांना संमत नव्हते तर अखिल विश्वातील सर्व जीवसृष्टीबद्दलच त्यांच्या मनात ही करुणा भरून राहिलेली होती. धर्मसंस्थापक किंवा साधु संत इत्यादींनी अहिंसेचे आचरण करायला सांगणे वेगळे आणि राजकारणाच्या क्षेत्रातील महात्मा गांधीजींसारख्या नेत्याने राजकारणातील एक शस्त्र म्हणून त्याचा वापर करणे हे वेगळे होय. ' क्षमा शस्त्र जया नराचिया हातीं दुष्ट तयाप्रती काय करी असा



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

अनुभव तुकाराम महाराजही सांगतात पण राजकारणासारख्या सत्तास्पर्धेच्या खेळामध्ये अहिंसेचे व सत्याग्रहाचे महत्त्व गांधीजींनी आग्रहपूर्वक मांडले व आचरणात आणण्याचाही मनःपूर्वक प्रयत्न केला पण अशा तत्त्वाचे आचरण करण्यासाठी असलेली मानसिक शक्ती सर्वसामान्य माणसांजवळ नसते. जेव्हा प्रतिकार करण्याचे बळच अंगी नसते तेव्हा तो अहिंसेचा आश्रय घेतो व सामर्थ्य मिळताच हिंसेकडे वळतो.

गांधीजींनी अहिंसा हे तत्व जीवनमूल्य राजकारणात शस्त्र म्हणून उपयोगात आणले व निःशस्त्र असलेल्या भारतीय जनतेच्या मनात सरकारविरोधी उठाव करण्याचे बळ आणून दिले. 'रणाविना स्वातंत्र्य कोणा मिळाले?' हे सत्य असले व भारताचे स्वातंत्र्यही केवळ अहिंसेच्या पालनाने मिळालेले आहे असेही नाही. हे वास्तव असले तरीही हिंसेमध्ये शस्त्राचे बळ आहे पण अहिंसेमध्ये शापाचे बळ आहे. हिंसेला हिंसेने उत्तर दिल्याने हिंसाचार वाढतो पण तोच प्रतिकार अहिंसेने केला तर हिंसाचाराला आळा बसतो. प्रश्न आहे तो हिंसेचा प्रतिकार अहिंसेने करता येतो तो किती मर्यादिपर्यंत? जर माणुसकीची मूल्ये शत्रूच्या रक्तात भिनलेली असतील तरच हिंसेला या मार्गाने प्रतिबंध होऊ शकतो असा महात्मा गांधीजींना विश्वास आहे. महात्मा गांधी हे चालू युगातील अहिंसेचे थोर उपासक होते. गांधींच्या जीवनावरही जैन धर्माचा आणि जैन गुरूंचा बराच परिणाम झालेला होता. गांधींनी आपल्या जीवनाचे सर्व तत्त्वज्ञान अहिंसा व सत्य यावर अधिष्ठित केले होते. जीवनाच्या सर्व अंगोपांगांना अहिंसेने स्पर्श केला होता. खाजगी जीवनात त्याचप्रमाणे सामाजिक व राजकीय जीवनातही अहिंसातत्त्व कार्यान्वित करण्याचे त्यांनी हिरीरीने प्रयोग केले. राजकारणात त्यांनी सत्याग्रहाचे नवीन तंत्र उपयोगात आणले आणि पुढे विविध प्रकारच्या परीस्थितींमधुन गेल्यानंतर गांधीजींनी अहिंसा हाच एकमेव मार्ग आहे हे पक्के केले. गांधीजींच्या मते अहिंसा हा मनुष्याचा स्थायीभाव आहे. जे देश आणि समाज अहिंसेच्या मार्गाचा अवलंब करतात त्यांनी आत्मसन्मान सोडून बाकी सगळ्याचा त्याग करायला शिकायला हवे. अहिंसा हे कुठल्या भित्र्या माणसाचे नाही तर उलट धाडसी माणसाचे लक्षण आहे असे गांधीजी म्हणतात. शिवाय गांधीजींची अहिंसेची शिकवणूक सर्वांनाच पाळणे शक्य आहे. गांधीजींची ही अहिंसात्मक चळवळ भारतातील सामान्य जनतेत प्रचंड लोकप्रिय झाली त्याचबरोबर गांधीजींनी सत्याला पण खूप महत्व दिले. ते म्हणतात की इतर सर्व गोष्टींपेक्षा माझे प्रेम अहिंसेच्या तत्वावर आहे. अहिंसेच्या तत्वाइतके कशावर माझे प्रेम असेल तर ते सत्यावर आहे. अहिंसा हे साधन आहे व सत्य हे साध्य आहे. त्यामुळे जर आपण साधनांची काळजी घेतली तर आपण साध्यापर्यंत पोहोचणारच यात काही शंका नाही असे गांधीजींचे मत होते. अहिंसा हा मनुष्याचा स्थायीभाव असल्याने त्याने प्रश्न सुटतात तर हिंसेने प्रश्न अधिक बिकट होतात त्याचबरोबर अहिंसेने मनुष्यात बदल होतो, मनुष्याचा आजार बरा होतो व तो अन्याय करणे सोडतो. अहिंसा मनुष्यामनुष्यामधले परस्परप्रेमाचे नाते पक्के करते. त्यामुळे ब्रिटीशांविरुध्द लढतानाही गांधीजींचे ब्रिटीश जनतेवर तितकेच प्रेम होते जितके भारतीय जनतेवर होते. या दृष्टीने विचार केल्यास गांधीजींची अहिंसेची विचारसरणी संपूर्ण जगासाठी आदर्श ठरते. सध्याचे असणारे अनेक जागतिक बिकट प्रश्न परस्पर सहकार्याने व परस्पर प्रेमाने सुटु शकतील असे वाटते. शिवाय गांधीजींचा अहिंसात्मकरीत्या सत्याग्रह करण्याचा मार्ग त्या काळातील परिस्थितीनुसार भारतीय जनतेस रुचणारा होता. त्यामुळे गांधीजींनी स्वातंत्र्याची चळवळ सामान्य जनतेपर्यंत नेली व त्या चळवळीला उदंड प्रतिसाद मिळवून दिला. अहिंसेचा मार्ग एखाद्या व्यक्तीमध्ये परिवर्तन नक्कीच घडवू शकते पण पूर्ण समुहात आपण परिवर्तन घडवू शकतो काय ? मला वाटतं एकाच वेळी घडवू शकत नाही तर मग दहशतवादासारखी समस्या यातून सुटू शकते काय? याचेही उत्तर बऱ्यापैकी नकारात्मकच आहे.

सामाजिक जीवनामध्ये आणि आंतरराष्ट्रीय व्यवहारामध्ये अहिंसेचा उपयोग होऊ शकेल पण त्यासाठी लोकशाहीची मूल्ये समाजात दृढमूल व्हावी लागतील, वांशिक भेद मिटावे लागतील, बुद्धिवादाची वाढ व्हावी लागेल आणि वर्गकलह नष्ट व्हावे लागतील. धर्मामध्ये सांगितलेली अहिंसा ही वैयक्तिक आत्म कल्याणासाठी सांगितलेली असली, तरी



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

समाजाचे धारण-पोषण अहिंसेमुळे सुलभ होते, हे सहज दिसून येईल. दुसऱ्याने कष्ट करून मिळवलेल्या धनाचे अपहरण न करणे, स्वार्थासाठी असत्य वचनाचा उपयोग न करणे, स्वत:कडेच अपरिमित संपत्तीचा साठा न करणे इ. गोष्टी अहिंसेमध्येच येतात.

गांधीजींच्या अहिंसेबद्दल अजून एक महत्वाची गोष्ट अशी आहे की निर्बल आणि हतबल माणसाला अन्यायाचा प्रतिकार करण्याशिवाय दुसरा कुठला पर्यायच नाही. त्यामुळेच भगत सिंग, स्वातंत्र्यवीर सावरकर व इतर क्रांतिकारकांनीही आपल्या तुरुंगवासात होणार्या अन्यायाविरुध्द अहिंसात्मक सत्याग्रहाचा व उपोषणाच्या मार्गाचा अवलंब केलेला दिसतो म्हणजे गांधीजींच्या मार्गाचे जे कट्टर विरोधक होते तेसुध्दा दुसरा कुठला उपाय नसल्यावर त्याच गांधीजींच्या मार्गाचा अवलंब करतात. गांधीजींच्या अहिंसा तत्त्वाच्या पाठीशी त्यांनी लोकमताचे सामर्थ्य उभे केले होते. शारीरिक पातळीवरची हिंसा दिसू शकते, दाखविता येते, मानसिक किंवा बौद्धिक पातळीवर इतरांचे केले जाणारे शोषण ही सुद्धा एक प्रकारे हिंसाच होय. प्राणिमात्रांची हिंसा न करणे हे अहिंसेचे व्यापक रूप आहे पण अहिंसा पाळणे वेगळे व स्वतःच्या जगण्यासाठी अहिंसक होणे वेगळे. हिंसेचे शारीरिक, मानसिक, बौद्धिक असे वर्गीकरण करता येते तसेच अहिंसेचेही करता येते. हिंसेच्या पाठीमागे असलेला हेतू विनाशक असतो. मानवी दुःखाचे मूळ हिंसेमध्ये आहे. अतोनात महत्त्वाकांक्षेपोटी माणसं हिंसेचा स्वीकार करतात. बौद्धिक पातळीवरील हिंसा व्यक्तिस्वातंत्र्याला घातक आहे पण व्यक्तिस्वातंत्र्याच्या नावाखाली वाढणारे स्वार्थ व भ्रष्टाचार हे हिंसेचेच रूप आहे. समाजात मानवी मूल्ये जपलेली असल्याशिवाय अहिंसेचे पालन करणे अवघड असते.

बौद्ध धर्माच्या अष्टांगशीलामध्ये अहिंसेला महत्त्वाचे स्थान आहे आणि बौद्धधर्मी भिक्षूंचा आचारही अहिंसेला पोषक असाच आहे. अशोकाने बौद्ध धर्मातील अहिंसेचे स्वतः आचरण केले व लोकांना धडा घालून दिला. आपल्या शिलालेखांतून त्यांनी एकंदर प्राण्यांवर दया करण्यासंबंधी आणि त्यांचे रक्षण-पोषण करण्यासंबंधी लोकांना आज्ञा दिली आणि त्यांनी राजवाड्यातील प्राणिहत्या थांबविली. अशा प्रकारे अहिंसा हे मानवी मूल्य मानले जाते. हिंसाचार करणाऱ्याच्या प्रवृत्तीत बदल करणे हे अहिंसेला शक्य होऊ शकते. गांधीजींनी हे मानवी तत्त्व राजकारणात शस्त्र म्हणून वापरले. त्यांच्या अहिंसा तत्त्वाच्या पाठीशी अनेक लोकमताचे सामर्थ्य त्यांनी उभे केले आणि अहिंसेच्या सामर्थ्यावर भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले म्हणून अहिंसा परमो धर्मः हे सार्थक ठरते.

## शेतकऱ्याची व्यथा आणि दशा....

काय आयुष्याची दशा ?
कशी मांडावी कथा ?
हवे त्याचेच काळीज
सांगण्या त्याची व्यथा.....!

फाटक्या त्या प्राक्तनाचा
आणखी काळजावर घाव ,
दुष्काळ मोडून पाडतो
उभ्या पीकाचा डाव ;



चटके खाऊन उन्हाचे
वाट साऊलीची पाहतो ,
किमया नियतीची न्यारी
कधी पूरातही वाहतो ;

त्या पूरालाही साहतो
असा दुष्काळ झेलतो ,
दगडासम जगणे त्याचे
भूकेला जगाच्या पेलतो ;

हाती नव्हे त्याच्या काही
कष्टाने सारे-सारे सांधतो ;
स्वप्न मातीची - मातीला
तरी झुला आकाशी बांधतो....!

– आकांक्षा काळे .



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

POSTAL REGISTRATION NUMBER G/RNP/ABD/469/2019-2022

# मासिक जीवन गौरव

www.jeevangauravmagazine.com

सामाजिक, साहित्यिक, क्रीडा, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्राला वाहिलेले मासिक

वार्षिक सभासदत्व ३०० रु.

द्विवार्षिक सभासदत्व ६०० रु.

JEEVAN GAURAV

QR Code स्कॅन करा व जीवन गौरव मासिकाचे सभासद व्हा...

Mob.: 8888125610

आजीव सभासदत्व ५००० रु.

संस्थेसाठी आजीव सभासदत्व ५००० रु.

## जीवन गौरव वार्षिक सभासद व्हा व महाराष्ट्रात कुठेही पोस्टाने अंक घरपोच मिळवा.

जीवन गौरवच्या नावे वार्षिक वर्गणी / जाहिरात शुल्क किंवा देणगी पाठविण्यासाठी पोस्टात, देशभरातील कुठल्याही बँक ऑफ महाराष्ट्राच्या शाखेत पुढील खाते क्रमांकावर रक्कम जमा करता येते.

महाराष्ट्र बँक शाखा-गारखेडा, औरंगाबाद (1770)

ACCOUT NO.:-60238696645 I IFSC CODE - MAHB0001770 I MICR CODE - 431014019

(टीप : पैसे भरल्यानंतर व्हॉटस अॅप क्रमांक : 8888125610, किंवा 9403751806 या क्रमांकावर एसएमएस करावा.)

पत्रव्यवहाराचा पत्ता :

**संपादक जीवन गौरव**

प्लॉट नं. २७, आनंदनगर, गल्ली नं. ६,

आम्रपाली बुद्ध विहाराजवळ,

गारखेडा परिसर, औरंगाबाद - ४३१००९

संपर्क : ८८८८१२५६१०

प्रति, ____________

मा. ____________

____________

____________

हे मासिक, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक रामदास रखमाजी वाघमारे यांनी रेड प्रिंटस, बायजीपुरा, औरंगाबाद येथे छापून कार्यालय, प्लॉट नं. २७, आनंदनगर, गल्ली नं. ६, आम्रपाली बुद्धविहाराजवळ गारखेडा परिसर, औरंगाबाद. (महाराष्ट्र) ४३१००९ येथे प्रकाशीत केले.
संपर्क : 8888125610, 8975529173, 9403751806 E-mail : jeevangaurav76@gmail.com

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist. Osmanabad